## महत्त्वाचे

### खेडलेपरमानंद येथे जागेच्या कारणावरुन हाणामारी

**गणेशवाडी (वार्ताहर)**– नेवासा तालुक्यातील खेडलेपरमानंद येथे जागेच्या कारणावरून हाणामारी झाल्याची घटना घडली आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी, दौलतराव सदाशिव तुवर यांची गावठाण गट नं. ६५ मध्ये दिड गुंठा जागा असून फिर्यादी हे त्या ठिकाणी दि. ३ रोजी काम करत होते. त्याच वेळी त्या ठिकाणी लतीब शेख अहमद इनामदार, बशीर शेख अहमद इनामदार, अजिम लतीब शेख इनामदार, बादशहा बुऱ्हाण इनामदार सर्व राहणार खेडलेपरमानंद हे आले. ही जागा आमची आहे. तुम्ही या ठिकाणी काही करायचे नाही असे म्हणत शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण करु लागले. तसेच जिवे मारण्याची धमकी दिली असल्याचे दि. ५ रोजी दाखल असलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. या फिर्यादीनुसार गुन्हा र नं. ३२६/२०२५ बीएनएसचे कलम ११५(२) ३५२,३५१(२)(३)प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सुरज मेढे हे करत आहेत.

### अकोलेत महेश जयंती उत्साहात साजरी



**अकोले (प्रतिनिधी)**– अकोले तालुका माहेश्वरी सभेच्यावतीने ४ जून रोजी महेश नवमी उत्सवानिमित्त भव्य शोभायात्रा काढण्यात आली. मिरवणूकीनंतर बुब श्रीराम मंदिर येथे शंकर भगवानची आरती घेण्यात आली. रक्तदान शिबिराचे आयोजन देखील करण्यात आले होते. या सर्व कार्यक्रमाचे नियोजन अध्यक्ष विजय सारडा आणि सचिव विशाल राठी यांनी केले. तसेच दिवसभरात वेगवेगळ्या प्रकारचे कार्यक्रम आणि स्पर्धा देखील घेण्यात आल्या. क्रिकेट स्पर्धा, बुद्धिबळ स्पर्धा यानंतर उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्यात आली. महेश नवमी हा उत्सव साजरा करण्यात आला. त्यात अध्यक्ष विजय सारडा, सचिव विशाल राठी, जिल्हा उपाध्यक्ष सोमनाथ मुंदडा, रामनिवास राठी, रमेश सारडा, सतीश बुब, समीर जाजू, सुरेश करवा, नीरज मुंदडा, प्रसाद राठी, योगेश मुंदडा तसेच महिला सभासद देखील सहभागी होत्या.

## ब्राम्हणी येथील ग्रीनअप फार्मर प्रोड्यूसर कंपनीच्या

# ७ संचालकांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल

**राहुरी (प्रतिनिधी)**– राहुरी तालुक्यातील ब्राम्हणी येथील ग्रीनअप फार्मर प्रोड्युसर कंपनीच्या माध्यमातून राहुरी, नेवासा व सोनई येथील अनेक शेतकरी व व्यापाऱ्यांची जवळपास काट्यावधी रुपयांची फसवणूक झाल्याची घटना उघडकीस आली आहे. या बाबत राहुरी पोलिस ठाण्यात कंपनीचे संचालक मयत सचिन ठूबे यांच्यासह सात जणांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गणेश रामभाऊ फाटके, वय ३७ वर्षे, रा. हिंगोणी, ता. नेवासा, यांनी राहुरी पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, गणेश फाटके यांनी दि. २० मार्च २०२५ रोजी त्यांच्या शेतात पिकवलेला सुमारे १ लाख ४० हजार रुपयांचा ७८ क्विंटल गहू राहुरी तालुक्यातील ब्राम्हणी येथील ग्रीनअप फार्मर प्रोड्युसर कंपनीला विकला होता. त्यानंतर गणेश फाटके यांनी विकलेल्या गव्हाच्या पैशाची मागणी केली असता कंपनीचे संचालक व कर्मचाऱ्यांकडून त्यांना वेळोवेळी उडवा-उडवीची उत्तरे देण्यात आली. त्यानंतर कंपनीचे संचालक सचिन ठूबे यांनी आत्महत्या केली. काही दिवसांनी गणेश फाटके यांनी पुन्हा पैशाची मागणी केली असता, आता तुमचे बिलाचे रक्कम मिळणे अवघड आहे किंवा शक्यच नाही, तुमचे पैसे बुडाले, असे कंपनीच्या कर्मचाऱ्यांकडून गणेश फाटके यांना उत्तर देण्यात आले. त्याचबरोबर ग्रीनअप फार्मर प्रोड्युसर कंपनीच्या माध्यमातून राहुरी तालुक्यातील मानोरी, वळण तसेच सोनई व नेवासा येथील अनेक शेतकरी व व्यापाऱ्यांची सुमारे ६५ लाख ४२ हजार ३३९ रुपयांची फसवणूक झाल्याचे उघडकीस आले. यामध्ये ग्रीनअप फार्मर प्रोड्युसर कंपनीचे संचालक, व्यवस्थापक व इतर सर्वांनी मिळून संगनमताने कट कारस्थान रचले. आणि राहुरी तालुक्यातील मानोरी येथील नानासाहेब आढाव, रुचिता काळे, प्रसाद वाघ, वळण येथील सोपान आढाव, संतोष काळे, सुर्यभान भाकरे, रविंद्र आढाव, नेवासा तालुक्यातील हिंगोणी येथील गणेश फाटके, अशोक खिल्लारी तसेच सोनई येथील पोपट ढाले, संजयकुमार भाळगट आदी शेतकरी व व्यापाऱ्यांची फसवणूक करण्यात आली.

या बाबत गणेश रामभाऊ फाटके या शेतकऱ्याच्या फिर्यादीवरून राहुरी पोलिस ठाण्यात आरोपी मयत सचिन वसंत ठुबे यांच्यासह अर्जुन मच्छिंद्र ठुबे, बाळासाहेब हापसे, छाया दत्तात्रय कातोरे, कविता हापसे, सतिश ढोकणे, अनिल रखमाजी हापसे, सर्व राहणार ब्राम्हणी, ता. राहुरी या सात जणांवर गु.र.नं. ६२६/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम ३१८ (४), ३ (५) प्रमाणे फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## राहाता लायन्स क्लबची नूतन कार्यकारिणी जाहीर

**राहाता (वार्ताहर)** – राहाता लायन्स क्लबची नूतन कार्यकारणी जाहीर झाली असून अध्यक्षपदी अ‍ॅड. संतोष घोडके, सचिवपदी रतन चौधरी तर खजिनदारपदी अ‍ॅड. गोरख दंडवते यांची निवड करण्यात आली आहे.



माजी अध्यक्ष प्रकाश सदाफळ यांच्या अध्यक्षतेखाली नवीन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. झोन चेअरमनपदी निवड झाल्याबद्दल डॉ. संजय उबाळे यांचे अभिनंदन करून सन्मान करण्यात आला. यावेळी अ‍ॅड. दंडवते, अंजली उबाळे, श्वेता कार्ले, सरला तायडे, स्मिता मुरादे, आस-ावरी बेंद्रे यांनी मनोगत व्यक्त केले. नव्याने जाहीर झालेल्या कार्यकारिणीत उपाध्यक्षपदी डॉ. संजय गायकवाड, राजेंद्र बांगर, मुन्ना शाह, मार्गदर्शक डॉ. संजय उबाळे, मेंबरशीप चेअरमन अंजली उबाळे, समन्वयक अ‍ॅड. दिनेश कार्ले, फंडरायजिंग चेअरमन दीपक दंडवते, अ‍ॅक्टिव्हिटी चेअरमन व्यंकटेश अहिरे, कम्युनिकेशन चेअरमन डॉ. शर्वरी कुलकर्णी, सर्व्हिस चेअरमन डॉ. प्रतीक घोडेराव, प्रसिद्धी प्रमुख किरण वाबळे, सागर सोमवंशी, टेमर सरला तायडे, टेल ट्विस्टर श्वेता कार्ले, सदस्य प्रकाश सदाफळ, डॉ. बापूसाहेब पानगव्हाणे, दशरथ तुपे, सचिन मुरादे, उमेश शेटे, अर्चना दंडवते, डॉ. वृणालिनी घोडेराव, स्मिता मुरादे, लता जाधव यांचा समावेश आहे.

## संत ज्ञानेश्वर इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये पर्यावरण दिन साजरा

**कोपरगाव (तालुका प्रतिनिधी)** – संत ज्ञानेश्वर इंग्लिश मीडियम स्कूल सप्तर्षी मळा शाखा व जेऊर पाटोदा येथे जागतिक पर्यावरण दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे संस्थापक तथा माजी नगराध्यक्ष राजेंद्र झावरे, विश्वस्त विशाल झावरे, मुख्याध्यापक सचिन मोरे, स्थानिक नागरिक, पालक, विद्या-र्थी, शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते. पर्यावरण संवर्धनात वृक्ष लागवडीचे महत्त्व ओळखून शाळेने या हरित उपक्रमात सक्रीय सहभाग घेतला. यावेळी उपमुख्याध्यापिका वैशाली लोखंडे, शिक्षिका मोनिका नन्नावरे, संगीता गाडे व नेटी डिसोजा यांनी विद्यार्थ्यांना आपले




पर्यावरण वाचवणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. लहान वयातच पर्यावरणपूरक सवयी अंगीकारल्यास भविष्य अधिक सुरक्षित होईल, असे सांगत पर्यावरणाचे महत्व पटवून दिले. नववीतील विद्यार्थिनी जानवी पणीकर हिने पर्यावरण दिनाचे महत्त्व समजावून सांगितले. विज्ञान शिक्षिका अनिता खरात यांनी वृक्ष लागवड कशी करावी याचे प्रात्यक्षिक करून दाखवले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मदतीने बेल, चिंच, लिंब व जांभळाच्या झाडांचे शाळेच्या आवारात वृक्षारोपण केले. तसेच मुख्याध्यापक मोरे यांनी सर्व विद्यार्थ्यांना आपल्या घराजवळ किमान एक वृक्ष लावण्यास सांगितले.

## कोपरगावमधील रिक्षा थांब्याचा श्वास ‘पुन्हा’ मोकळा

### पालिकेच्या पथकाने ट्रॅक्टर भरुन साहित्य केले जप्त

**कोपरगाव (तालुका प्रतिनिधी)** – येथील पालिका प्रशासने बुधवारी (दि.४) सकाळी बाजारपेठेतील विविध भागात संयुक्त अतिक्रमण हटाव मोहीम राबवली. पहिल्याच दिवशी तब्बल चार ट्रॅक्टर साहित्य जप्त करण्यात आले. त्यामुळे अतिक्रमण करणाऱ्यांचे धाबे दणाणले आ-हेत. या कारवाईने संबंधितांची चांगलीच पळापळ झाली. रिक्षा थांब्यावरील अतिक्रमणे मोठ्या प्रमाणात हटवण्यात आल्याने पुन्हा एकदा मोकळा श्वास घेतला आहे. दरम्यान, ही मोहीम सुरूच राहणार असून पुन्हा अतिक्रमण करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे मुख्याधिकारी तथा प्रशासक सुहास जगताप यांनी सांगितले.

फेरीवाले, भाजीवाले, खाद्यपदार्थ, चहाच्या टपऱ्या तसेच दुकानांचे फलक भररस्त्यात ठेवण्यात आल्यामुळे बाजारपेठेचा श्वास कोंडला होता. यामुळे पायी चालणेही कठीण झाले होते. पाच महिन्यांपूर्वी २२ व २३ फेब्रुवारीला संपूर्ण शहरात धडाकेबाज अतिक्रमण हटाव मोहीम राबवली होती. मात्र, बाजारपेठेतील रस्ते पुन्हा एकदा जाम झाले होते. त्यामुळे अतिक्रमणांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला. या पार्श्वभूमीवर पालिका प्रशासनाने अतिक्रमण हटाव मोहिमेचे नियोजन करून कारवाई केली.

त्यानुसार बुधवारी सकाळी प्रत्यक्ष मोहीम राबवण्यात आली. मेन रोड, बँक रोड, धारणगाव रोड, रिक्षा थांबा परिसर आदी भागात दिवसभर ही मोहीम सुरू होती. पालिकेच्या पंचवीस ते तीस कर्मचाऱ्यांच्या बंदोबस्तात जेसीबी, ट्रॅक्टर लवाजम्यासह ही कारवाई करण्यात आली. पहिल्याच दिवशी तब्बल चार ट्रॅक्टर साहित्य जप्त करण्यात आले. काही ठिकाणी दुकानांच्या पायऱ्या, पत्र्यांचे शेड ओट्यांचे पक्के अतिक्रमण जेसीबीने पाडण्यात आले. मोठ्या लवाजम्यासह कारवाई सुरू झाल्याने अतिक्रमणधारकांची चांगलीच पळापळ झाली. काही ठिकाणी अधिकारी नागरिकांमध्ये शाब्दिक चकमक झाली. परंतु अतिक्रमणधारकांचा फारसा विरोध झाला नाही. अनेकांनी आपले अतिक्रमण स्वत: हून काढून घेतले. कारवाई पाहण्यासाठी बघ्यांची मोठी गर्दी झाली होती. अतिक्रमणधारकांनी पालिकेच्या या मोहिमेचा चांगला धसका घेतला आहे. अनेक दिवसांच्या प्रतीक्षेनंतर रिक्षा थांबा व परिसरातील अतिक्रमण हटवण्यात आल्याने परिसराने मोकळा श्वास घेतला आहे. या कारवाईचे रिक्षा चालकांनी व शहरातील नागरिकांनी स्व-ागत केले आहे.या अतिक्रमण मोहिमेत मुख्याधिकारी सुहास जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली सुनील आरणे, प्रशांत उपाध्ये, सतीश साबळे, प्रवीण पठाडे, रमेश घोरपडे आदिंनी सक्रीय भाग घेतला होता. दरम्यान, पालिकेने अतिक्रमण काढलेल्या जागी तातडीने ब्लॉक बसवावे किंवा काँक्रिटीकरण करावे. तसेच येथे कुठल्याही प्रकारचे फ्लेक्स लावण्यात येऊ नये, छत्रपती शिवाजी महाराज व व्यापारी संकुल समोर उभ्या राहणाऱ्या रिक्षांना बस आगाराच्या भिंतीलालगत गटार बुजवून तेथे स्लॅब टाकून रिक्षांसाठी जागा करून द्यावी, अशी मागणी रिक्षा संघटनेचे उपाध्यक्ष राजेंद्र सालकर यांनी मुख्याधिकाऱ्यांकडे केली आहे.

## आवाज वाढव डीजे... आता नको रे बाबा!

### हनुमंतगाव व पाथरे बुद्रुक येथील नागरिक कर्णकर्कश आवाजाने हैराण

**हनुमंतगाव (वार्ताहर)** – राहाता तालुक्यातील हनुमंतगाव-लोणी रस्त्यावर असणारे लॉन्स येथे होत असलेल्या सर्रास डीजेच्या वापरामुळे परिसरातील नागरिक चांगलेच हैराण झाले आहे.

याबाबत हनुमंतगाव व पाथरे बुद्रुक ग्रामपंचायतला दिलेल्या निवेदनात रहिवाशांनी म्हटले आहे, की आपल्या गावच्या परिसरात मंगल कार्यालय (लॉन्स) आहे. सध्या लगीनसराई जोरात सुरू असून लग्न समारंभ, वरात, हळद यामध्ये डीजे वाजविण्याची प्रथा सुरू झाली असून, यामुळे अनेक वृध्द, लहान मुले यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. येथील नागरिकांनी मंगल कार्यालय व्यवस्थापन यांच्याकडे डीजेच्या आवाजाची तीव्रता कमी करणे व वेळेचे बंधन पाळणे याबाबत चर्चा केली होती. मात्र त्याचा काहीच फायदा झालेला नाही. मंगल कार्यालय परिसरात दाट लोकवस्ती आहे. लहान-लहान मुलं रडतात, काहींना या आवाजामुळे छातीमध्ये दुखते याचा कोणीही विचार करत नाही, हे सर्व घडत असताना शासकीय अधिकारी याकडे जाणून-बुजून दुर्लक्ष करतात की काय? असा प्रश्न निर्माण होतो.

काही नागरिकांना हृदयरोग, उच्च रक्तदाब असल्यामुळे या डीजेचा त्रास मोठ्या प्रमाणात होतो. आवाज एवढा कर्कश असतो की किमान एक ते दोन किलोमीटर अंतरावरील घरातील भांडे सुद्धा थरथर करत असल्याचे अनेकजण सांगतात. आवाजाची तीव्रता चार विभागांत गणली जाते. औद्योगिक वसाहतीमध्ये दिवसा ७५ डेसिबल तर रात्री ७० डेसिबल, कर्मशिअल झोनमध्ये दिवसा ६५ व रात्री ५५ डेसिबल, रहिवासी क्षेत्रात ५५ व रात्री ४५ डेसिबल, सायलेन्स झोनमध्ये दिवसा ५० व रात्री ४० डेसिबलचे निकष आहेत. वाद्य वाजविण्यासाठी पोलिसांकडून परवानगी काढावी लागते. याकडे कोणी सहसा लक्ष देत नाही. शुभ कार्यात विघ्न नको म्हणून पोलिसही परवानगी आहे किंवा नाही याकडे लक्ष देत नाहीत. यामुळेच ध्वनी प्रदू-षणात सातत्याने वाढ होत आहे. त्यामुळे अशा कार्यक्रमात डीजे वाजविण्यास बंदी अथवा आ-वाजावर नियंत्रण ठेवण्यासाठी शासकीय पातळीवर स्वतंत्र यंत्रणा असावी, तसेच ध्वनी प्रदूषण रोखण्यासाठी मार्गदर्शक सूचना द्याव्यात, अशी मागणी स्थानिक रहिवासी यांच्याकडून ग्रामविकास अधीकारी व संबंधित विभागाकडे करण्यात आली आहे.

## बीएसएनएल व एमटीएनएलची ५५ हजार कोटींची मालमत्ता विकणार

**नवी दिल्ली** – देशातील सरकारी मालकीच्या बीएनएनएल व एमटीएनएल या दूरसंचार कंपन्यांची जमीन विकण्याचा प्रस्ताव केंद्रीय अर्थ खाते व दूरसंचार खात्याने तयार केला आहे. या जमीन विक्रीतून ५५ हजार कोटी रुपये उभारले जाणार आहेत, अशी माहिती अर्थ खात्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली.

एमटीएनएल व बीएसएनएलवरील कर्जाचा बोजा कमी करण्यासाठी हे पाऊल उचलले जात आहेत. या विक्रीच्या जागांची माहिती तयार केली आहे.

एमटीएनएलची ४५.७५ अब्ज रुपये तर बीएसएनएलची ९ अब्ज रुपयांची जागा विक्री केली जाईल. सरकारी दूरसंचार कंपन्यांच्या मालकीच्या जमिनी येत्या काही वर्षांत विकल्या जातील, असे अधिकाऱ्याने सांगितले.

२०२५-२६ रोजी दहा हजार कोटी रुपये मालमत्ता मॉनिटाईज्डफ करून उभे केले जातील. त्यानंतरच्या वर्षांमध्ये अनुक्रमे २० हजार कोटी व नंतर १५ हजार कोटी रूपये उभारले जातील.

बीएसएलएनच्या मॉनिटायझेशन साठीच्या जागांची यादी तयार केली आहे. एमटीएनएलवर बीएसएनएलपेक्षा अधिक कर्ज आहे. तसेच अनेक कायदेशीर गुंतागुंतही आहे. एमटीएनएलच्या अनेक मालमत्ता १९९० पूर्वीच्या आहेत. त्यामुळे त्यांच्या स्ट्रक्चरलबाबत अडचणी आहेत.

एमटीएनएलच्या अनेक मालमत्ता या कार्यालयीन आहेत. त्यांचे मूल्यांकन हे व्यावसायिक मालमत्तापेक्षा अधिक आहे.

**एमटीएनएलवर ३३५ अब्ज रुपये कर्ज**

यंदा संपलेल्या ३१ मार्च रोजी एमटीएनएलवर कर्जाचा बोजा ३३५ अब्ज रुपये होता. एमटीएनएलने ८३.४६ अब्ज रुपयांचे कर्ज बुडवले आहे. तर बीएसएनएलवर २३३ अब्ज रुपयांचे कर्ज आहे. या कंपन्यांचा कारभार सुधारण्यासाठी सरकारने विविध उपाययोजना केल्या आहेत. २०१९ मध्ये या कंपन्यांना सरकारने ६९० अब्ज रुपयांचे पॅकेज दिले, तर २०२२ मध्ये सरकारने १.६४ ट्रिलीयन रुपयांचे पॅकेज मंजूर केले. नवीन भांडवल गुंतवणे, कर्जाची पुर्नरचना, ग्रामीण भागातील सेवा आदींचा त्यात समावेश होता.

## ईशान्य भारतात पूरस्थितीची भीषणता कायम

### ५० हून अधिक बळी; आसामपासून मणिपूरपर्यंत पूरसदृश्य स्थिती; भूस्खलनाच्या घटनांमध्ये वाढ

**गुवाहाटी** –आसाम आणि ईशान्येकडील इतर राज्यांमध्ये पुरामुळे भयावह परिस्थिती निर्माण झाली आहे. आसाम, मणिपूर, सिक्कीमसह ईशान्य भारतातील सात राज्यांमध्ये मृतांचा आकडा सुमारे ५० च्या वर पोहोचला आहे. आसाममधील पूरस्थिती दिवसेंदिवस अधिकच बिकट होत चालली आहे. पुरामुळे आणखी सहा जणांचा बुधवारी मृत्यू झाल्यामुळे यावर्षी आसाममधील पूर आणि भूस्खलन दुर्घटनांमधील मृतांचा आकडा १७ वर पोहोचला आहे.



पंतप्रधान नरेंद्र मोदी आसाम आणि इतर ईशान्येकडील राज्यांमधील परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहेत. पंतप्रधान मोदी यांनी मंगळवारी आसाम आणि सिक्कीमच्या मुख्यमंत्र्यांशी तसेच मणिपूरचे राज्यपाल अजय कुमार भल्ला यांच्याशी ईशान्येकडील राज्यांमधील पूर परिस्थितीचा आढावा घेतला. त्यांनी पूर धोक्याचा सामना करण्यासाठी तसेच मदत आणि पुनर्वसन प्रयत्नांमध्ये केंद्राकडून सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले.

**सात राज्यांमध्ये ४८ मृत्यू**

ईशान्येकडील राज्यांमध्ये २९ मे पासून पाऊस आणि पुरात झालेल्या ४८ मृत्यूंपैकी सुमारे १७ जणांचा एकट्या आसाममध्ये मृत्यू झाला आहे. त्याच वेळी, अरुणाचल प्रदेशात १२, मेघालयात ६, मिझोराममध्ये ५, सिक्कीममध्ये ४, त्रिपुरात २ आणि नागालँड आणि मणिपूरमध्ये प्रत्येकी एकाचा मृत्यू झाला आहे. अनेक ठिकाणी शाळा, बाजारपेठा, वाहतूक यंत्रणा कोलमडली असून शेती-भातीची कामेही खोळंबली आहेत.

**आसाममधील साडेसहा लाख लोकांना तडाखा**

आसाम राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या अहवालानुसार, २१ जिल्ह्यांमध्ये पूर आणि पावसामुळे साडेसहा लाखांहून अधिक लोक प्रभावित झाले आहेत. २१ जिल्ह्यांतील १,५०६ गावांमधील १४,७३९ हेक्टरपेक्षा जास्त शेतीवरही परिणाम झाला आहे. राज्यातील ब्रह्मपुत्रा आणि इतर सहा न्द्यांनी अनेक ठिकाणी धोक्याची पातळी ओलांडली आहे. आसाममधील एकूण सात नद्या धोक्याच्या पातळीच्या वर वाहत आहेत. यामध्ये हैलाकांडी जिल्ह्यातील मतिजुरी येथील कटखल नदीचाही समावेश आहे.

**मणिपूरमध्ये साडेदहा हजार घरांचे नुकसान**

मणिपूरमध्ये आलेल्या पुरामुळे ५६,००० हून अधिक लोक बाधित झाले आहेत. तसेच १०,४७७ घरांचे नुकसान झाले आहे. नद्यांच्या पाण्यामुळे राजधानी इम्फाळ आणि इम्फाळ पूर्व जिल्ह्यातील अनेक भाग जलमय झाले आहेत. या भागात नदीचे पाणी शेत शिवारांमध्ये आणि वस्त्यांमध्ये घुसल्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे.